पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८, प्रशासन विभाग,
क्र.प्रशा/१/कावि/ 320 /२०२०
दिनांक:- 13 /०३/२०२०

**विषय :- कोरोना विषाणु संसर्गाचा प्रादुर्भाव रोखणे तसेच कोरोना आजारास अटकाव करणेकामी अधिकारी / कर्मचारी यांच्या रजा रद्द करणे अथवा नव्याने रजा मंजूर न करणेबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणु संसर्गाचा धोका निर्माण झाला असून सदर आजाराचा प्रादुर्भाव रोखणे तसेच सदर आजाराचा संसर्ग झालेल्या नागरीकांना (रुग्णांना ) जास्तीत जास्त मदत महापालिकेच्या वतीने पोहोचवण्याच्या दृष्टीने महापालिकेत मध्यवर्ती नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरीकांना वेळेत मदत पोहोच होणेकामी महापालिकेतील अधिकारी/ कर्मचारी उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे.

आपत्कालीन परिस्थितीकरिता महापालिका अधिकारी/कर्मचारी उपलब्ध असणेचे दृष्टीने उपाययोजन करणे आवश्यक असलेने महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालय तसेच सर्व विभागातील सर्व अधिकारी/ कर्मचारी कामावर हजर असणे गरजेचे आहे.

सबब, मी.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी आदेश देत आहे की, महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयातील तसेच सर्व विभागातील अधिकारी / कर्मचा-यांच्या **दिनांक ३१/०३/२०२० पर्यंतच्या** सर्व प्रकारच्या रजा( वैद्यकीय अत्यावश्यक रजा वगळून) संबंधित विभागप्रमुखांनी मंजुर करु नयेत. तसेच जे अधिकारी /कर्मचारी यापूर्वीच रजा मंजुर करुन रजेवर गेले असतील अशा सर्व अधिकारी/कर्मचा-यांच्या रजा रद्द करण्यात येत आहेत. अशा अधिकारी / कर्मचा-यांनी त्वरीत कार्यालयात रूजू व्हावयाचे आहे. याशिवाय मनपाचे अधिकारी / कर्मचारी यांनी सुट्टीच्या दिवशी देखील कार्यालयाचे परवानगी शिवाय महापालिका कार्यक्षेत्र सोडू नये. याबाबतची सर्व कार्यवाही संबंधित विभागप्रमुखांनी करावी व सदर आदेशाची तातडीने अंमलंबजावणी करावी.

**आयुक्त,**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११ ०१८**

प्रति,
**सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

प्रत-
**सर्व विभागप्रमुख**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**